# तेलंगणा बिलाच्या मुद्द्यावर युपिएचा वास्तविक उद्देश काय आहे?

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

गेल्या एक दशकात तेलंगणा मुद्द्यावर युपिए सरकारचे वर्तन वारंवार बदलले आहे. 2004 साली युपिए सरकारने तेलंगणा राज्य स्थापित करण्याचे वचन दिले होते. सरकार तेलंगणा राज्य बनविण्याचा निर्णय सैद्धांतिक रित्या घेतल्याचे श्री पी चिदंबरम यांनी जाहीर केले. डिसेंबर-2009 पर्यंत वाट पाहण्यात आली. यानंतर सरकारचे वर्तन बदलले आणि संपूर्ण मुद्द्यावर तपास करण्यासाठी न्यायमूर्ती श्री कृष्ण कमिटी नियुक्त करण्यात आली. या समितीने कोणताही ठोस निष्कर्ष काढला नाही.

2013 मध्ये युपिए सरकारने पुन्हा तेलंगणा राज्य बनविण्यासाठी सैद्धांतिक रित्या निर्णय घेतला. मंत्रिमंडळाने हो-नाही करता करता त्याला मंजुरी दिली. संसदेच्या वर्तमान सत्रात त्या दिशेने प्रगती झाली नाही. सरकारच्या निर्णयाबाबत नकारात्मक प्रतिक्रियेमुळे परिणामकारक दृष्ट्या पुढे जाण्यास सरकार असमर्थ असल्याचे दिसले. भाजप संपूर्णपणे तेलंगणा वेगळे राज्य बनविण्याच्या बाजूने आहे. आम्ही सीमांध्र विस्तारातील लोकांची कायदेशीर चिंता लक्षात घेण्याची विनंती केली आहे. या दोहों दरम्यान समाधान काढण्याचे प्रयत्न मुश्किल किंवा अशक्य नाही आहेत. युपीए सरकारने त्या दिशेने परिणामकारक पावले उचलली नाहीत.

एनडीए सरकार द्वारे ज्याप्रकारे समाधानकारक आणि सरळ रित्या झारखंड, छत्तीसगड आणि उत्तराखंड हे तीन राज्ये बनविण्यात आली, त्याच्या समोर युपिए सरकारने तेलंगणाच्या रचनेचे घोंगडे भिजत घातले आहे. वर्तमान संसदीय सत्राला मात्र आठ दिवस बाकी आहेत. या आठ दिवसापैकी दोन दिवस मात्र सदस्यांच्या अंतर्गत कामकाजासाठी आरक्षित आहेत, जे दोन शुक्रवार आहेत. चालू सत्र परिणामकारक कायद्याच्या कामकाजासाठी फक्त सहा दिवस बाकी आहेत. आंध्र प्रदेश (पुनर्रचना) बील अजुनही संसदेत सादर करण्यात आले नाही. शेवटच्या मिनटापर्यंत हे बील युपिए कायदेत्मक आणि घटनात्मक रित्या, राज्य बनविण्यासाठी प्रयत्न करणार का त्याबाबत शंका आहे. काय युपिएचा अंतिम उद्देश या सत्रात तेलंगणा रचनेचा मुद्दा तसाच ठेवण्याचा आहे का?

नवीन राज्य स्थापित करण्याच्या मुद्द्यासह मोठे जनमत एकत्र आहे. राजकीय पक्षांनी जनतेमध्ये त्याबाबत महत्त्वाकांक्षा निर्माण केली आहे आणि त्यास साकार न करणे ही बाब अयोग्य आहे. युपिए सरकारने त्वरितच संसदेच्या दोन्ही सभागृहात आंध्रप्रदेश (पुनर्रचना) बील बहालीसाठी आणले पाहिजे. त्या दोन्ही विस्तारात हितावह असतील असे संतुलित बील आणण्याची घटनात्मक रित्या सुसंगत शिफारशी केल्या पाहिजेत. मी त्या बीलाला पाठिंबा देण्यासाठी प्रतिक्षा करित आहे.